सोबत महसूल व वन विभागाचे "सन २०१८ मधील नियोजित १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या संकल्पपूर्ती आणि ३३ कोटी वृक्षारोपणाबाबत प्रशासकीय विभागाच्या समन्वय अधिका-यांसमवेत सचिव (वने) यांची दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ आणि दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त" या विषयाचे शासन पत्र क्रमांक साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११, दिनांक २१.९.२०१८ ची प्रत सोबत जोडत आहे.

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१८/शा२३५८
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 10 OCT 2018

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

यांना कळविण्यात येते की, यांनी त्यांचे अधिपत्याखालील संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे व पुढील योग्य ती कार्यवाही त्वरित करावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्र. 8365
दिनांक 16 OCT 2018

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

क्र. तंशिसं/विकाना/वृक्षलागवड/2018/ 3516
दिनांक : 22 OCT 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग,
नागपूर .

सोबत जोडलेल्या सन 2018 मधील नियोजित 13 कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या संकल्पपुर्ती आणि सन 2019 मधील 33 कोटी वृक्षारोपणाबाबत प्रशासकीय विभागांच्या समन्वय अधिका-यांसमवेत सचिव(वने)यांची दि. 17 सप्टेबर, 2018 आणि दि. 19 सप्टेंबर 2018 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावे.

(गुलबिराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

सोबत महसूल व वन विभागाचे **"सन २०१८ मधील नियोजित १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या संकल्पपूर्ती आणि ३३ कोटी वृक्षारोपणाबाबत प्रशासकीय विभागाच्या समन्वय अधिका-यांसमवेत सचिव (वने) यांची दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ आणि दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त"** या विषयाचे शासन पत्र क्रमांक सावंवि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११, दिनांक २१.९.२०१८ ची प्रत सोबत जोडत आहे.

—·—·—·—·—·—·—

**क्रमांक : १६/संकीर्ण/२०१८/शा२३५८**
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

**दिनांक : 10 OCT 2018**

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
यांना कळविण्यात येते की, यांनी त्यांचे अधिपत्याखालील संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे व पुढील योग्य ती कार्यवाही त्वरित करावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक 8365
दिनांक -1 6 OCT 2018

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# महाराष्ट्र शासन

क्र. साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११.
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दि. २१ सप्टेंबर, २०१८.

प्रति,

सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव

**विषय :- सन २०१८ मधील नियोजित १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या संकल्पपूर्ती आणि ३३ कोटी वृक्षारोपणाबाबत प्रशासकीय विभागाच्या "समन्वय अधिकाऱ्यांसमवेत" सचिव (वने) यांची दि. १७ सप्टेंबर, २०१८ आणि दि. १९ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

**संदर्भ :- शासन समक्रमांकाचे पत्र दि. १२ सप्टेंबर, २०१८.**

**महोदय,**

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार प्रशासकीय विभागांच्या "समन्वय अधिकाऱ्यांची" सचिव (वने) यांच्या समवेत दि. १७ सप्टेंबर, २०१८ आणि दि. १९ सप्टेंबर, २०१८ रोजी दुपारी ३.३० वा. बैठक झाली.

सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयांचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. बैठकीत घेतलेल्या निर्णयाबदल कालमर्यादा उपस्थित असणाऱ्या अधिकाऱ्यांना बैठकीत अवगत करण्यात आली होती. तरी सदर इतिवृत्तात नमूद करण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वन विभागास सादर करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील समन्वय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात, अशी नम्र विनंती आहे.

आदरपूर्वक.

पत्र प्राप्त झाले
19 SEP 2018

आपला,

(वीरेन्द्र तिवारी) 21/9
अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय),
महसूल व वन विभाग

प्रत माहिती आणि कार्यवाहीसाठी :-

१. सर्व प्रशासकीय विभागांतर्गत समन्वय अधिकारी.
२. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
३. सचिव (वने) यांचे स्वीय सहायक.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय), यांचे स्वीय सहायक.
५. सह सचिव (श्री.दोडल), यांचे स्वीय सहायक.
६. सह सचिव (श्री.कोदे), यांचे स्वीय सहायक.

24/9

दिनांक 25/9/18
कार्यासन

प्रत माहिती आणि कार्यवाहीसाठी :-

१. सर्व विभागीय आयुक्त (महसूल).
२. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य पुणे.
३. सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.
४. सर्व कार्यकारी संचालक, सिंचन विकास महामंडळे, जलसंपदा विभाग.
५. सर्व विद्यापीठांचे मा. कुलगुरू.
६. सर्व कृषी विद्यापीठांचे मा. कुलगुरू.
७. सर्व जिल्हाधिकारी.
८. सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९. सर्व आयुक्त महानगरपालिका.
१०. सर्व प्रादेशिक विभागांचे प्रमुख.

प्रत माहिती आणि कार्यवाहीसाठी :-

१. प्रधान मुख्यवनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर.
२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (सामाजिक वनीकरण) (पुणे).
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (उत्पादन आणि व्यवस्थापन) नागपूर.
   व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी.
५. सर्व पालक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.
७. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) (सर्व).
८. महाव्यवस्थापक/क्षेत्रीय व्यवस्थापक महाराष्ट्र वन विकास महामंडळ (सर्व).

प्रत माहिती आणि कार्यवाहीसाठी :-

१. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण (सर्व)
२. उप वनसंरक्षक (प्रा.) (सर्व).
३. सर्व विभागीय वन अधिकारी (प्रा.) (सर्व).
४. विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) (सर्व).
५. विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ (सर्व)

**विषय :- सन २०१८ मधील नियोजित १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या संकल्पपूर्ती आणि ३३ कोटी वृक्षारोपणाबाबत प्रशासकीय विभागाच्या "समन्वय अधिकाऱ्यांसमवेत" सचिव (वने) यांची दि. १७ सप्टेंबर, २०१८ आणि दि. १९ सप्टेंबर, २०१८ रोजी दुपारी ३.३० वा. झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

विषयांकित बैठकीस श्री वीरेंद्र तिवारी, अप्पर प्रधान मुख्य वनसरंक्षक (मंत्रालय), श्री. डी.एल. थोरात, विशेष अधिकारी (वने) आणि सर्व प्रशासकीय विभागांचे समन्वय अधिकारी उपस्थित होते. बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांची यादी सोबत जोडली आहे.

सद्याच्या आणि भावी पिढीला उत्तम व आरोग्यदायी पर्यावरण निर्मितीमध्ये समन्वय अधिकारी चांगले योगदान देत असून विभागांना दिलेलया उद्दिष्टापेक्षा जास्त वृक्ष लागवड व्हावी व हरित महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात साकार व्हावे असे आवाहन सुरूवातीला सचिव (वने) यांनी सर्व उपस्थितांना केले. त्यानंतर, विविध विषयांवर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले:-

| अ. क्र. | विषय | निर्णय | अंमलबजावणी अधिकारी | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सावनि-२०१८/प्र.क्र.१४४/फ-११ दि. ६ सप्टेंबर, २०१८ अन्वये सर्व प्रशासकीय विभागांना जिल्हानिहाय आणि यंत्रणानिहाय ३३ कोटी वृक्ष लागवडीच्या उद्दिष्ट वाटपाबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देवून नियोजन व पूर्वतयारीबाबत कार्यवाही सुरु करण्याबाबत. | १) प्रत्येक प्रशासकीय विभागांतर्गत महसूल विभागनिहाय व जिल्हनिहाय ३३ कोटी वृक्ष लागवड उद्दिष्टाचे विवरणपत्र तयार करून त्यानुसार वाटप आणि त्या अनुषंगाने लँड बँक तयार करण्याबाबत दि. २१ सप्टेंबर, २०१८ पर्यंत क्षेत्रीय यंत्रणाना निर्देश देण्यात यावेत. या संदर्भातील आदेशांच्या प्रती सचिव (वने), सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, प्रशासकीय विभागाचे प्रादेशिक प्रमुख, जिल्हास्तरावरील महत्त्वाची कार्यालये यांना देण्यात याव्यात. वृक्ष लागवडीसाठीची लँड बँक दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत तयार करण्याबाबत क्षेत्रिय यंत्रणेबरोबर सातत्याने पाठपुरावा ठेवावा.<br>नगर विकास विभागाचे सुधारित उद्दिष्ट स्वतंत्रपणे वन विभागाकडून कळविण्यात येत आहे. त्यानंतर नगर विकास विभागाने क्षेत्रीय यंत्रणांना उद्दिष्ट वाटप नंतर पाठवावे. | सर्व समन्वय अधिकारी आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व प्रशासकीय विभागांचे क्षेत्रीय अधिकारी. | दि. २१ सप्टेंबर, २०१८ ते ३१ ऑक्टोबर, २०१८ संबंधित विषयानुसार. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २) पर्यटन विभागाने वृक्ष लागवडीसाठी जागेच्या उपलब्धततेची अडचण सांगितली. वृक्ष लागवडीसाठी पर्यटन विभागांच्या कार्यालयांचा परिसर, कार्यक्षेत्रशासकीय पर्यटन स्थळे, विभागाकडून सेवा घेणाऱ्या व्यक्ती व संस्था, खाजगी पर्यटन स्थळे व त्या लगतची रिझॉर्ट, गड व किल्लयांवर गिरीभ्रमण करणारे पर्यटक इत्यादींचा वृक्ष लागवड कार्यक्रमासाठी विचार झाल्यास वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास अडचण येणार नाही, असे चर्चेअंती ठरले. हिच बाब इतर सर्वच प्रशासकीय विभागांना लागू राहील याबाबतत सर्वांचे एकमत झाले. त्यानुसार, पुढील कार्यवाही करण्याचे ठरले. | वरीलप्रमाणे. | त्वरीत कार्यवाही. |
| | | ३) वैद्यकीय शिक्षण विभागाने खाजगी आणि अनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांचा वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमात समावेश करण्याबाबत सूचना करण्यात आली. त्याचप्रमाणे कौशल्य विकास विभागा मार्फत खाजगी आय.टी.आय यांचाही सामावेश करता येईल. जी.एस.टी विभागामार्फत त्यांच्याशी संबंधित डिलरद्वारे वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम पार पाडता येईल. त्याशिवाय, अन्न आणि नागरी पुरवठा विभागामार्फत जिवनावश्यक वस्तूंचा लाभ घेणारे लाभार्थी यानांही या कार्यक्रमात सामावून घेता येईल. त्याशिवाय इतर विभागांनी त्यांच्याकडून सेवा घेणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना वृक्ष लागवडीत समाविष्ट करून घेण्याबाबत विचार व्हावा.<br>शिक्षण विभागाने खाजगी आणि अनुदानित शाळांना या कार्यक्रमात सामाविष्ट करुन घ्यावे. उच्च तंत्र शिक्षण विभागाने खाजगी आणि अनुदानित महाविद्यालये, डिम युनिव्हर्सिटी व सलग्न संस्था यांना सामावून घ्यावे.<br>त्यानुसार, संबंधित विभागाने अशारितीने समाजाच्या विविध घटकांना सामावून घेऊन त्यानुसार वृक्ष लागवडीची लँड बँक तयार करण्यात यावी. | समन्वय अधिकारी, वैद्यकिय शिक्षण, कौशल्य विकास, जी.एस.टी- वित्त विभाग, अन्न आणि नागरी पुरवठा विभाग व इतर संबंधित विभाग. | त्वरीत कार्यवाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. सावनि-२०१८/प्र.क्र.१६६/ फ-११ दि. ७ सप्टेंबर, २०१८ अन्वये ज्या प्रशासकीय विभागांना **"महाराष्ट्र हरित सेनेमध्ये"** सदस्य नोंदणीबाबत उद्दिष्ट वाटप केले आहे त्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देवून उद्दिष्ट पूर्तीबाबत करावयाची कार्यवाही. | १) "महाराष्ट्र हरित सेनेमध्ये" सदस्य नोंदणी बाबत ज्या प्रशासकीय विभागांकडे मोठा वाव आहे अशा १५ प्रशासकीय विभागांना शा. नि. महसूल व वन विभाग दि. ७ सप्टेंबर, २०१८ अन्वये उद्दिष्ट वाटप करण्यात आले. त्या अनुषंगाने क्षेत्रिय यंत्रणांना दि. २१ सप्टेंबर, २०१८ पर्यंत उद्दिष्ट वाटपाचे आदेश पाठविण्यात यावेत. आदेशांच्या प्रती वर नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना पाठविण्यात याव्यात. हरित सेनेमध्ये १ कोटी सदस्स नोंदणीची उद्दिष्टपुर्ती दि. ३१ डिसेंबर, २०१८ पूर्वी होण्यासाठी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन द्यावे आणि या कामाचा समन्वय अधिकाऱ्यांनी सातत्याने आढावा घ्यावा. | वरीलप्रमाणे. | दि. २१ सप्टेंबर, २०१८ ते ३१ ऑक्टोबर, २०१८ संबंधित विषयानुसार. |
| | | २) प्रत्येक कार्यालयामध्ये हरित सेनेमध्ये नोंदणीसाठी प्रशिक्षित कर्मचारी व अधिकारी यांचे गट तयार करण्यात यावे. अशा गटांनी कॅम्प आयोजित करुन इंटरनेट सेवेसह संगणक त्या ठिकाणी लावून सदस्य नोंदणीची प्रक्रिया गतिमान करावी. | | |
| | | ३) विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी, विभागांतर्गत सेवा घेणारे व सेवा पुरविणारे लाभार्थी आणि विभागाशी जोडल्या गेलेल्या व्यक्ती, संस्था व संघटना यांना सदस्य नोंदणीमध्ये सहभागी करुन घ्यावे. | | |
| ३ | प्रत्येक प्रशासकीय विभागांच्या संकेतस्थळावर वृक्ष लागवड व संगोपन (Tree Site ) हा विषय अंतर्भूत करून संकेतस्थळ अद्ययावत करणे. या संदर्भात मा. मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांनी सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांना लिहिलेले दि. ३ सप्टेंबर, २०१८ रोजीचे पत्र , कृपया पहा | मा.मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांच्या निर्देशानुसार प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या संकेत स्थळावर "ट्री साईट"हा विषय अंतर्भुत करण्यात यावा. या संकेत स्थळावर प्रशासकीय विभागाने आतापर्यंत केलेली वृक्ष लागवडीची जिओ टॅगिंगसह स्थळे, उत्तम कॅमेऱ्याद्वारे घेतलेले फोटो, यशोगाथा (Success Stories), इत्यादी माहिती या साईटवर अपलोड करावी. जेणेकरून वृक्षरोपण व संगोपन कार्यक्रम लोकचळवळीत रुपांतरित करण्याच्या दृष्टीने हे दिशादर्शक ठरेल. | वरीलप्रमाणे. | त्वरीत कार्यवाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | वृक्ष लागवड व संगोपन हा विषय प्रत्येक बैठकांमध्ये स्थायी विषय म्हणून ठेवणे आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दौऱ्याच्या वेळी वृक्ष लागवड स्थळांना भेटी देणे. | यानुसार कार्यवाही होते किंवा नाही याबाबत सर्व समन्वय अधिकाऱ्यांनी सनियंत्रण करावे. याबाबत आकस्मितरित्या काही बैठका सुरू असताना माहिती घ्यावी. तसेच बैठकांचे इतिवृत्त मागवून त्याबाबत खात्री करावी. जेणेकरून हा बैठकांचा भाग म्हणून कायमस्वरूपी विकसित होत जाईल. | वरील प्रमाणे. | तात्काळ कार्यवाही. |
| ५ | सन २०१८ मधील १३ कोटी वृक्षारोपणांतर्गत विविध घटकांची माहिती वन विभागाच्या संकेत स्थळावर अपलोड करणे. | वन विभागाच्या संकेत स्थळावर प्रत्येक प्रशासकीय विभागाने १३ कोटी वृक्ष लागवडीची जिओ टॅगिंगसह स्थळे, उत्तम कॅमेऱ्याद्वारे घेतलेले फोटो, व्हिडीओ क्लिप्स, यशोगाथा (Success Stories), इत्यादी माहिती दि. ७ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत अपलोड करण्याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात. | वरील प्रमाणे. | तात्काळ कार्यवाही. |
| ६ | अ) सन २०१८ मधील आणि त्यापूर्वी झालेल्या वृक्ष लागवडीचे संगोपन आणि सन २०१९ मधील प्रस्तावित ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवडीसाठी पूर्व पावसाळी कामे या करिता सन २०१८-१९ मधील " कार्यक्रमावरील खर्च" या लेखाशिर्षामधून ०.५ टक्के मर्यादेत निधी "कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे ( Re-appropriation ) उपलब्ध करून घेणे.<br>ब) सन २०१८-१९ मध्ये " वृक्ष लागवड आणि संगोपन" कार्यक्रमाकरिता नव्याने लेखाशिर्ष करणे. | मा. मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार प्रत्येक प्रशासकीय विभागाने वृक्ष लागवड व संगोपनासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष घेणे तसेच सन २०१८-१९ मध्ये वृक्ष लागवड व संगोपनासाठी ०.५% मर्यादेत कार्यालयीन खर्चात तरतूद करण्याबाबतचे प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाकडे पाठविण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. संबंधित समन्वय अधिकाऱ्यांनी वित्त व नियोजन विभागाकडे पाठपुरावा करून सदर प्रस्ताव दि. ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत मान्य करून घ्यावेत. त्यानंतर महालेखापाल नागपूर/ मुंबई यांची मान्यता दि. १५ ऑक्टोबर २०१८ पर्यंत मिळवावी. मा. मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांच्या निर्देशाप्रमाणे पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पाची तयारी लवकरच सुरू होत असल्याने तत्पुर्वी वर नमूद केल्याप्रमाणे कालमर्यादेत कार्यवाही व्हावी. | वरीलप्रमाणे. | दि. ३० सप्टेंबर, २०१८ ते १५ ऑक्टोबर, २०१८ संबंधित विषयानुसार. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ंचायती ,नगरपालिका , महानगरपालिका ,शहर विकास प्राधिकरणे प्रशासकीय विभागांतर्गत मंडळे आणि महामंडळे यांनी त्यांच्याकडिल उत्पन्नाच्या टक्के ०.५ स्त्रोतातून किमान रतूदतवृक्ष आणि संगोपन याबाबत कार्यक्रमासाठी उपलब्धता करुन देण्याबाबत. | ग्रामपंचायतींना १४ व्या वित्त आयोगामार्फत विविध विकास कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. त्याअंतर्गत विविध विकास कामांसाठी निधी खर्च करण्याची मुभा ग्रामपंचायतींना असते.<br>त्यातून पर्यावरण संरक्षण व समृद्धी अंतर्गत वृक्ष लागवड आणि संगोपनासाठी काही निधी उपलब्ध केल्यास वृक्ष लागवड , देखभाल, पाण्याची उपलब्धता, संरक्षण इत्यादी बाबी उत्तम प्रकारे पार पाडता येतील. त्याचप्रमाणे, ग्रामपंचायतीकडे उपलब्ध होणाऱ्या स्वत:च्या उत्पन्नाच्या स्त्रोतामधून वृक्ष लागवड आणि संगोपनासाठी किमान ०.५ टक्के निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. वृक्ष लागवड आणि संगोपन कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायतीना दिलेले उद्दिष्ट साध्य करता येईल. तसेच, वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम निरंतरपणे पुढे सुरू ठेवता येईल.<br>तरी वरीलप्रमाणे सूचना ग्राम विकास विभागाने सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गट विकास अधिकारी पंचायत समिती व ग्राम सेवक, ग्रामपंचायती यांच्या स्तरापर्यंत पाठविण्यात याव्यात. | ग्रामविकास विभाग. | त्वरीत कार्यवाही. |
| | | महानगरपालिकालिका व शहर नगरपा , विकास प्राधिकरणे यांनी वृक्ष लागवड आणि संगोपनासाठी स्वत:च्या उत्पन्नाच्या स्त्रोतामधून उपलब्ध होणाऱ्या निधीतून ०.५ टक्के मर्यादेत निधी उपलब्ध करून द्यावा. तरच, नगरपालिका, महानगरपालिका आणि शहर विकास प्राधिकरणे यांना दिलेले उद्दिष्ट साध्य करणे सोपे जाईल. तसेच, वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम निरंतरपणे पुढे सुरू ठेवता येईल.<br>तरी वरीलप्रमाणे सूचना नगर विकास विभागाने सर्व मुख्याधिकारी नगरपालिका , आयुक्त महानगरपालिका व शहर विकास प्राधिकरणाचे सर्व प्रमुख अधिकारी यांना द्याव्यात. | नगरविकास विभाग. | त्वरीत कार्यवाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | उर्जा विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत उत्पादन कंपनी, वितरण कंपनी आणि पारेषण कंपनी यांना त्यांच्याकडील एकूण उत्पन्नाच्या स्त्रोतातून कार्यक्रमावरील खर्चामधून ०.५ टक्के निधी वृक्ष लागवड व संगोपनासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात यावे. | उर्जा विभाग | त्वरीत कार्यवाही. |
| | | त्याचप्रमाणे इतर विभागांतर्गत मंडळे व महामंडळे यांना देखील वृक्ष लागवड व संगोपनाचे उद्दिष्ट पूर्ण करणे व हा कार्यक्रम निरंतरपणे पुढे सुरु राहण्यासाठी त्यांच्याकडील उत्पन्नाच्या स्त्रोतामधून किमान ०.५ टक्के निधी उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित विभागांनी सूचना द्याव्यात. | सर्व प्रशासकीय विभाग व त्या विभागांचे समन्वय अधिकारी. | त्वरीत कार्यवाही. |
| ८ | सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते बांधणी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात वृक्ष लागवड आणि संगोपन बंधनकारक करण्याबाबत . | सार्वजनिक बांधकाम विभागाने वृक्ष लागवड व संगोपनासाठी रस्ते बांधणीच्या अंदाजपत्रकात तरतूद करणे आणि रस्त्यांच्या विस्तारीकरणांमध्ये तोडली जाणाऱ्या झाडांचे जवळच्या भागात पुर्नरोपण करणे इ. संदर्भात वन विभागाने दिलेल्या प्रस्तावांबाबत तपासणी करून धोरणात्मक निर्णय लवकर होण्याबाबत कार्यवाही व्हावी. | समन्वय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग. | तात्काळ कार्यवाही. |
| ९ | वृक्ष लागवड व संगोपनाबाबत उद्योग विभागांमार्फत धोरणात्मक निर्णय. | उद्योग विभागाने औद्योगिक आस्थापनांच्या परिसरात किमान ३३% हरित क्षेत्र निर्माण करणे, खनिज विकास निधीतून वृक्ष लागवड व संगोपनासाठी निधी उपलब्ध करून देणे, कोल्ड फिल्ड क्षेत्रात वृक्ष लागवड बंधनकारक करणे इ. संदर्भात वन विभागाने दिलेल्या प्रस्तावांबाबत तपासून अंतिम निर्णय घेण्याबाबत कार्यवाही व्हावी. | समन्वय अधिकारी, उद्योग विभाग | तात्काळ कार्यवाही. |
| १० | वृक्ष लागवड व संगोपनासाठी अधिक क्षेत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महसूल विभागामार्फत धोरणात्मक निर्णय. | अकृषिक परवानगी देताना काही क्षेत्रांमध्ये वृक्ष लागवड बंधनकारक करण्याबाबत वन विभागाने दिलेल्या प्रस्तावांबाबत तपासणी करून त्यासंदर्भात निर्णय होण्याबाबत महसूल विभागामार्फत आवश्यक कार्यवाही व्हावी. | समन्वय अधिकारी, महसूल विभाग | तात्काळ कार्यवाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ... लागवडीसाठी अधिकची लँड बँक उपलब्ध होण्यासाठी जलसंपदा विभागाने तयार करावयाची माहिती. | वृक्ष लागवडीसाठीच्या प्रस्तावित लँड बँकमध्ये पूर्ण संचय पातळी (FRL-१) आणि पुराच्या वेळची पूर्ण संचय पातळी (FRL-२) या मधील संपादित क्षेत्रात वृक्ष लागवडीसाठी खूप वाव आहे. अशा क्षेत्रात बांबू व तत्सम प्रजाती आणि अन्य स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करता येऊ शकेल. याबाबत तालुका ते प्रादेशिक महसूल स्तरावर महत्वाच्या धरणांची लँड बँक तयार करून त्याची माहिती विहित प्रपत्रात पाठविण्याबाबत सचिव (वने) यांनी प्रधान सचिव (जलसंपदा) यांना दि. ३ एप्रिल, २०१८, २ मे २०१८ आणि दि. २३ ऑगस्ट २०१८ अन्वये पत्र पाठविली आहेत. त्यासंदर्भात माहिती उपलब्ध करणे. | समन्वय अधिकारी, जलसंपदा विभाग | तात्काळ कार्यवाही. |
| १२ | अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी व विभागांनी वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमात उत्कृष्ट काम केले त्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात यावे. | या अनुषंगाने सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये कार्यक्रम नियोजित असून त्यामध्ये जिल्हाधिकारी आणि इतर अधिकारी यांना मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री आणि इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत सन्मानित करायचे आहे.<br>प्रत्येक प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यानी वृक्ष लागवड आणि संगोपन क्षेत्रात केलेल्या उत्तम आणि नाविन्यपूर्ण कामगिरीबाबत माहिती वन विभागास दि. ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत द्यावी. | सर्व समन्वय अधिकारी आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व प्रशासकीय विभागांचे क्षेत्रीय अधिकारी. | दि. ३० सप्टेंबर, २०१८ |
| १३ | २ कोटी, ४ कोटी आणि १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमात लावलेल्या रोपांचे संगोपन आणि देखभाल व जिवंत राहण्याचे प्रमाण. | राज्याच्या बऱ्याच भागात पावसाने ओढ दिल्याने पाण्याची उपलब्धतता विविध मार्गाने करण्याबाबत मा. मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांनी सर्व प्रशासकीय विभागांना आणि जिल्हा यंत्रणांना दि. ९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या पत्राने सूचना दिल्या आहेत. यामध्ये विभागाकडील कार्यक्रमावरील खर्चामधून ०.५ टक्के मर्यादेत निधी उपलब्ध करावा अशाही सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे याबाबत शा.प्र. क्र.साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११ दि. ९ ऑगस्ट २०१८ अन्वये सर्व विभागांना सूचना दिल्या आहेत. त्यानूसार वृक्षांचे संगोपन आणि सरंक्षणाबाबत सर्व प्रशासकीय विभागानी क्षेत्रिय यंत्रणांना पुन्हा सूचना द्याव्यात. | सर्व समन्वय अधिकारी आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व प्रशासकीय विभागांचे क्षेत्रीय अधिकारी. | तात्काळ कार्यवाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | शहरांच्या विकास आराखडयाच्या (Development Plan) धर्तीवर वृक्ष लागवड आराखडा (Tree Plantation Plan-TPP) तयार करण्याबाबत. | प्रत्येक महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रासाठी वृक्ष लागवड आराखडा तयार करण्याबाबत मा. मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांनी नगर विकास विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, आयुक्त महानगरपालिका आणि मुख्याधिकारी नगरपालिका यांना दि. २६ जून, २०१८ आाणि ३ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रांना कळविले आहे. यानुसार वन विभागाने प्रस्ताव नगर विकासाकडे पाठविला आहे. त्याबाबत नगर विकास विभागाकडून लवकरात लवकर निर्णय व्हावा. | समन्वय अधिकारी, नगर विकास विभाग. | त्वरित कार्यवाही |
| १५ | - | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे समन्वय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे सूचना केली.<br>"मागेल त्याला शेततळे" या योजनेच्या धर्तीवर वृक्ष लागवड आणि संगोपन या योजनेअंतर्गत "मागेल त्याला वृक्ष" हा कार्यक्रम राबविण्यात यावा त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही अपेक्षित आहे<br>वन विभागाच्या रोपवाटिका निवासी वस्तीपासून दूर असतात. त्यामुळे खाजगी व्यक्ती /संस्थांना झाडे लावण्यास उद्युक्त करण्यासाठी जवळच्या ठिकाणी रोपे उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रायोगिक तत्वावर काही रेल्वे स्टेशन अथवा बस स्थानकात, ग्राम पंचायत तलाठी कार्यालय, विद्युत मंडळ अशा ठिकाणी जेथे लोकांचा नेहमीचा राबता असतो अशा निवडक ठिकाणी रोपे उपलब्ध करून देण्यात यावीत.<br>वरील सूचनेच्या अनुषंगाने तपासणी करून पुढील योग्य ती कार्यवाही व्हावी. | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख ), प्रधान मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण, प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ आणि सर्व मुख्य वनसंरक्षक. | कार्यवाहीसाठी |
| १६ | - | सर्व समन्वय अधिकारी पर्यावरणाच्या व अंतिमत: मानवजातीच्या हितासाठी वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमात उत्तम योगदान देत असून या सर्व कामानध्ये १००टक्के पारदर्शकता ठेवावी आणि जनतेला हा कार्यक्रम स्वत:चा कार्यक्रम आहे अशी भावना निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे असे सचिव (वने) यांनी सांगितले. | वरीलप्रमाणे. | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | त्याशिवाय वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रमाची ज्योत सतत तेवत ठेवण्यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभागांतर्गत संस्थात्मक संरचना ( Institutional Mechanism ) तयार होणे गरजेचे आहे. त्यामधून वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम कार्यक्षमतेने आणि परिणामकारकरितीने कार्यान्वित करणे शक्य होईल.<br><br>त्याचप्रमाणे, शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक व वैयक्तिक प्रयत्नाद्वारे एखादा चांगला उपक्रम धोरणात्मक निर्णयाद्वारे जनतेपर्यंत पोहोचवण्याची व प्रत्यक्षात कृतीत उतरवण्याची क्षमता असते. त्याचा उपयोग वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम शासनाच्या कृतीद्वारे जनमानसाच्या मनामध्ये रुजविण्याचा, बिंबवण्याचा आणि लोकचळवळीत रुपांतरीत करण्याचा प्रयत्न व्हावा असेही सचिव (वने) यांनी उपस्थितांना आवाहन केले.<br><br>तसेच, वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व समन्वय अधिकाऱ्यांनी CO-33 crore plantation या समन्वय अधिकाऱ्यांच्या Whatsup Group वर आपल्या नाविन्यपूर्ण सूचना व काही अडचणी असल्यास त्या सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना याबाबत विचारमंथन करावे .<br><br>त्यानंतर सर्वांचे आभार मानल्यानंतर बैठक संपन्न झाली. | | |

******************************